विशेष लेख क्र.१४२

***यशकथा***

६ भाद्रपद १९२९ शके (सायं.५.३० वा.)
मंगळवार, दि. २८ ऑगस्ट २००७

## गावकऱ्यांनीच घेतली
## पाणी पुरवठ्याच्या स्त्रोताची काळजी

**बुलढाणा जिल्ह्याच्या संग्रामपूर तालुक्यातील पातुरडा हे एक गांव. या गावातील नागरिकांनी एकत्र येऊन पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचा विकास केला. त्यांच्या प्रयत्नांचा हा आढावा.**

पातुरडा हे गाव लोकसंख्येच्या आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठे असलेले एक गाव. पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी गावांत फक्त तीन विहिरी आहेत. त्यामुळे उन्हाळ्यामध्ये सर्वत्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागायचे, तसे या गावी पाणीटंचाई ही अगदी नित्याची बाब झालेली. त्यात अस्तित्वात असलेल्या पाणीपुरवठा योजनेतील काही त्रुटी आणि पाण्याची गळती हेही एक प्रमुख कारण.

ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती आणि ग्रामीण सामाजिक लेखा परिक्षण समिती यांच्या सभासदांनी एकत्र येऊन यावर विचारविनिमय केला व पाणी टंचाई संदर्भातील प्राथमिक माहिती लोकसहभागाच्या माध्यमातून गोळा केली. प्रत्यक्ष ठिकाणाना भेटी देऊन सध्याच्या पाणी पुरवठ्यामध्ये आणि सांडपाण्याच्या व्यवस्थेमध्ये असलेल्या त्रुटी शोधण्याचे ठरविण्यात आले.

गावातील विविध भागांमध्ये प्रत्यक्ष फिरुन लोकसहभागाच्या माध्यमातून सध्याच्या पाणीपुरवठ्याचे स्त्रोत असलेल्या स्थळांची प्रारंभी पाहाणी करण्यात आली. गावकऱ्यांना प्रथम पाणी पुरवठा करणाऱ्या मुख्य विहिरीकडे नेण्यात आले. ती विहीर रानटी झाडाझुडपांनी वेढलेली असल्याचे निदर्शनास आले. विहिरीच्या आजूबाजुला कचरा, घनकचरा, हॉटेलमधील टाकाऊ पदार्थ टाकण्यात आले होते. त्यामुळे या परिसराला कचराकुंडीचे स्वरुप प्राप्त होऊन तेथील परिस्थिती आरोग्याच्या दृष्टीने अतिशय घातक होती.

...२/

ही सर्व घाण दूर करण्याचा गांवकऱ्यांनी पक्का निश्चय केला आणि पहिले प्राधान्य दिले ते पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताला. ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समितीच्या सदस्यांनी त्या परिसराची स्वच्छता करण्याचे काम नियोजनपूर्वक पूर्ण केले. त्यामुळे एका आठवडयात तेथील संपूर्ण परिसराचा कायापालट झाल्याचे दिसू लागले. स्वच्छ झालेल्या या भागात कुंपण घालण्यात आले. धार्मिकदृष्ट्या आणि औषधीदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या तुळशीच्या झाडांची लागवड येथे करण्यात आली. त्या जागेची तसेच विहिरीची योग्य काळजी आणि निगा राखण्यासाठी एका व्यक्तिची नियुक्ती करण्यात आली.

येथील महिला आणि गावकरी या बदलामुळे अतिशय आनंदी आणि समाधानी झाले. नंतर समितीच्या सभासदांचे दुसऱ्या दोन पाणी पुरवठा करणाऱ्या स्त्रोतांकडे लक्ष गेले. बस स्थानकाजवळ असलेली विहीरही उघडी होती. तेथील लोक त्या जागेचा उपयोग कचरा आणि टाकाऊ पदार्थ टाकण्यासाठी करत असत. मटण मार्केट आणि दारुच्या दुकानाजवळ असलेली तिसरी विहीरसुद्धा आरोग्याला घातक असलेल्या अवस्थेत होती. हे निदर्शनास आल्यावर ग्रामपंचायत आणि ग्रामीण पुरवठा व स्वच्छता समितीने तातडीची बैठक बोलावून चर्चा केली व या दोन्ही विहीरीची स्वच्छता करण्याचे ठरविले. दोन्ही विहिरींच्या विकासासाठी ग्रामपंचायतीनेही आवश्यक तो खर्च करण्यास तयारी दर्शविली व सामुदायिक प्रयत्नाने या पाणी पुरवठा योजनांची सुधारणा करण्यास सुरुवात केली. प्रत्यक्ष गावकऱ्यांनीच पुढे येऊन लोकसहभागातून पाणीपुरवठ्या सारखा एक महत्त्वाचा प्रश्न सोडविला.

-- श्रीपाद नांदेडकर
वरिष्ठ सहाय्यक संचालक

००००